IRJMSH

# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

UGC ID - 48312

Impact Factor* : 7.8012

Ref:IRJMSH/2024/A1018369

DOI : HTTPS://DOI.ORG/10.32804/IRJMSH

ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)

THIS CERTIFIES THAT

**PROF. ANSHUMATI RAJENDRA KAHANE**

HAS/HAVE WRITTEN AN ARTICLE / RESEARCH PAPER ON

**आदिवासी साहित्य आणि लोककला उपविषय – आदिवासी लोककला**

APPROVED BY THE REVIEW COMMITTEE, AND IS THEREFORE PUBLISHED IN

Vol – 15 , Issue – 2 Feb , 2024

International Research Journal of Management Sociology & Humanities ★ IRJMSH

Editor In Chief

www.IRJMSH.com

Google scholar
Academia.edu
Cabell's Directory
Computer Science Directory
Microsoft Academic
EBSCO
Electronic Journals
doi

# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

IRJMSH

ISSN 2277 – 9809 (online)
ISSN 2348 - 9359 (Print)

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# आदिवासी साहित्य आणि लोककला

## उपविषय - आदिवासी लोककला

**प्रा. अंशुमती राजेंद्र काहाणे**
(मराठी विभाग प्रमुख)
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी,
जि. अमरावती ४४४७०५
ई-मेल- anshumati.pendokhare@gmail.com

भारतीय स्मृतिग्रंथात आदिवासी जमातीचा उल्लेख सापडतो. त्यांचा रामायणात निषाद, किरात, शबर रक्श असा उल्लेख आहे. कच्चे मांस खाणारे म्हणून किरातांचा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद आणि किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी म्हणून म्हटले आहेत. एकलव्य, शबरी, निषादराजगृह आदिवासी होते.

सन १७१८ ते १९४७ पर्यंतच्या काळात आदिवासींनी पिळवणुकीविरुद्ध जवळ जवळ ७५ बड़े केली. सतराव्या शतकात आदिवासींच्या जीवनावर आधारलेले ललित साहित्य लिहिले गेले. प्रख्यात फ्रेंच लेखक रुसो याने आदिवासी जीवनाबद्दल युरोपमध्ये मते व्यक्त केली. युरोपातील दर्यावर्दी देशांनी समुद्रप्रवास करून अनेक आदिवासी जमातींच्या संस्कृतीचे अध्ययन केले. मानववंश शास्त्रज्ञांनी अमेरिका, अफ्रिका, आशिया आणि ऑस्ट्रेलिया खंडातील आदिवासीचे शास्त्रशुध्द अध्ययन सुरु केले. त्यामुळे आदिवासीच्या जीवनाबद्दल सर्वसामान्य माणसात थोडीबहुत संवेदना निर्माण झाली.

जिथे टाकला त्या पाय
तिथुन निघाला सागर
तुही वयख सांगते
लाल किल्ल्याचा पत्थर

श्री राजेश महल्ले असे यथार्थ वर्णन आदिवासी जमातीच्या संदर्भात करतात च्यानवाचा सुसंबद्ध इतिहास गतकाळात कुठे ना कुठे विसावता त्याही पूर्वीच्या काळात ज्यांची पावले या भूमित रोवली गेली ते सर्व लोकसमूह म्हणजे आदिवासी येथील मूळ निवासी जल, जंगल व जमीन यांचे मुळधनी येथील क्षेत्राधिपती सुदृढ व संपन्न सांस्कृतिक वारसा लाभलेला गौरवशाली इतिहासाने मोडत झालेला भाषा-

साहित्य कला या क्षेत्रात पुढालेला आणि शास्त्राचा निर्माता असलेला हा आदिवासी समाजछ या आदिवासींचा आदिम, प्राचिनतम घटक म्हणून समजला जाणारा पारधी यांच्या प्राचीन परंपरा विविध चालिरीती, त्यांची भाषा, रंगीबेरंगी पोषाख, राहणीमान सामुदायिक जीवन, अदभुतरम्य आणि बहुरंगी उत्सव देवकार्यातील नैसर्गिक आणि परिपूर्ण आनंद यांच्या संस्कृतीचे होणारे अदभूत दर्शन संशोधनाच्या दृष्टीने, अभ्यासाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिलेली दिसते.

आदिवासींची कला बहुरंगी आहे. घरावरील नक्षीकाम, स्मशानातील कोरीव स्मृतिस्तंभ, आभूषणे, मुखवटे यांच्या निर्मितीमध्ये आदिवासींची कलादृष्टी दिसते. साजशृंगाराची आवड आदिवासींना निसर्गतःच आहे. अंगावर कलापूर्णरित्या गोंदवून घेणे त्यांना फार आवडते, टोप्या, टोपल्या, चटया, वाद्ये यांची रंगसंगती, कोरीवकाम व नक्षीकाम कलात्मक असते. चकचकीत दगडांच्या माळा बनविण्यात येतात. झाडाच्या सालापासून वस्त्रे बनवितात. दागिण्यात जर्मन सिल्व्हर, अल्युमिनीयम, तांबे, पितळ, कवड्यांचा उपयोग करतात. लाकडाची फणी केसात खोचून ठेवतात. तंबाखु ठेवण्यासाठी कलापूर्ण डब्या आदिवासी बनवतात. त्या डब्यांना आंबा, कासव, मासा इत्यांदीचे आकार देतात. दरवाजावर प्राण्याची चित्रे कोरतात.

आदिवासीच्या कलामध्ये नृत्याला फार महत्वाचे स्थान आहे. काही जमाती अत्यंत कौशल्यपूर्ण नृत्य करतात. प्रजासत्ताक दिनी आदिवासांनी राजधानीत सादर केलेली नृत्ये अत्यंत कलापूर्ण असतात.

आदिवासीमध्ये लोक कलाकार सुध्दा आहेत. ते आपला उदर निर्वाह कलेचे प्रदर्शन करून करतात. त्यांचे जीवन यजमानावर अवलंबून असते. अशा लोककलाकारांत मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील परधानांचा समावेश केला जातो. परधानाचे जीवन भटके असते. त्यांना गोंडाचे भाट म्हणतात. परधानांचे गोड यजमान असतात, गोंडाकडे जाऊन ते वंशावली कथा सांगतात. किंगरी या वाद्यावर गाणी म्हणतात. यजमानांचे मनोरंजन करतात. परधान स्त्रियों गॉड स्त्रियांच्या दाई म्हणून काम करतात. त्या मुलींच्या हातपायावर गोंदून देतात परधानांचे भटकणे नियोजित असते, गोंड यजमानांनी दिलेल्या सामग्रीवर त्यांचे जीवन निर्भर असते.

आदिवासी कला या विषयांतर्गत आदिवासी आणि कला या दोन महत्वाच्या घटकांचा अंतर्भाव हातो. पैकी आदिवासी म्हणजे विशिष्ट पर्यावरणात राहणारा, विशिष्ट बोलीभाषा बोलणारा, विशिष्ट जीवनपध्दतीने व परंपरांनी नटलेला आणि शेकडो वर्षे जंगलपहाडात जीवन जगत असतांना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्ये जोपासणारा मानवी समूह म्हणजे आदिवासी होय छ डॉ. गोविंद गारे आदिवासी आणि कला यांचा अन्योन्य संबंध असून, कलात्मक अविष्कारातून खऱ्या अर्थाने आदिवासींचे वेगळेपण सिद्ध होते. आदिवासीच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे त्यांच्या कला होत. त्यामुळे

आदिवासी जीवन आणि कला यांना वेगवेगळे स्थान न देता कलात्मक जीवन म्हणजे आदिवासींचे जीवन होय, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

निसर्गाशी संवाद साधून आदिवासी लोकसमुहाचे जे कलात्मक प्रगटीकरण होते ते प्रगटीकरण म्हणजे आदिवासी कला हीय. अशा या आदिवासी कलामध्ये नृत्य, नाट्य, गीत, संगीत, चित्र, वास्तू या महत्वाच्या कला होत.

आदिवासी कलांपैकी नृत्यकला प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये पाहवयास मिळते. आदिवासी समुहाने आपल्या सुखदुःखाच्या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी नृत्यांचा आधार घेतला. बहुतेक अभ्यासकांनी मोराच्या नृत्यापासून आदिवासींनी नृत्याचा स्विकार केला आहे असे म्हटलेले आहे. लग्नप्रसंग, पिकांचा हंगाम, सणवार, धान्याचे स्वागत. यावेळी निसर्गाशी असलेली जवळीकता, देवतांनी केलेली आराधना नृत्यामधून पाहावयास मिळते. निसर्गातील अनाकलनीय शक्तींना प्रसन्न करण्यासाठी आदिवासी नृत्य करतात. कारण आदिवासींना माहीत आहे की आपले संपूर्ण जीवन निसर्गावर अवलंबून आहे. दृष्ट शक्तींचा वास निसर्गात असतो, त्यांच्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी बहुतेक आदिवासींनी नृत्याचा स्वीकार केलेला आहे. आदिवासींच्या नृत्यकलेत वडील, मुलगा आणि नातू हे तीन पिढयांचे प्रतिनिधी आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे आपोआप एका पिढीतील नृत्याचे संस्कार दुसऱ्या पिढीत संक्रमित होतात. आदिवासीच्या नृत्य कलेतील युद्ध व नृत्ये मृतात्म्यांच्या चैतन्य शक्तीला आदरांजली वाहण्यासाठी शिकार नृत्ये, आदिवासी जमातीतील शिकारातील जोश, धाडस आनंद व्यक्त करण्यासाठी धार्मिक नृत्ये भय शक्ती पासून संरक्षण मिळण्यासाठी तसेच देवाची मूर्ती पवित्र झाड यांच्या सभोवती नृत्य होते. कारण येथेच आपल्या जीवनातील मनोकामना पूर्ण होणार ही त्यांची श्रद्धा असते. तर सामाजिक नृत्यात पहाडातील देवतांना प्रसन्न करणे हा हेतू दिसून येतो.

आदिवासी नृत्यकला आणि वाद्ये आदिम लोकसाहित्याची अविच्छिन्न अंगे नृत्यकला कोरकू कोरकू स्त्री- पुरुष अत्यंत उत्सवप्रिय आहेत. त्यांच्या विविध संणात, उत्सवात आणि विवाहादि प्रसंगी गायन व नृत्य हे विशेष करुन असते. कोलाम कोलामाच्या दंडारक या नृत्य नाट्यात संगीत व नृत्याची लयलूट असते. दिवाळी व होळीच्या वेळो बगाड मागतात. कार्तिक महिण्यात विविध देव देवतांची सोंगे रंगवून दंडार रचतात.

**परधान** - परधार, किंगरी किंवा बना वाद्याच्या सुरावर मृत पूर्वजांचे गुण गाणारे हे परधान जमातीचे लोक आपल्या बना वाद्यांवर निरतिशय प्रेम करतात.

गोंड - गोडाचे ढेमसा नृत्य आनंदाच्या प्रसंगी किवा देव वसविण्याच्या प्रसंगी करतात. स्त्री पुरुष मिळून प्रचंड ढोलाच्या तालावर हे नृत्य करतात. माडिया घनदाट अरण्यात, निसर्गाच्या कुशीत जीवन व्यतीत करणारे मांडिया गोंडाचेच भाऊबंद, पांढया रंगाच्या साड्या नेसलेल्या, विविध प्रकारची रंगीबेरंगी फुले व फण्या केसात खोवलेल्या गळ्यात विविध मण्यांच्या बेंबीपर्यंत लांब माळा घातलेल्या माडिया युवती आणि कमरेभोवती वस्त्र गुंडाळून डोक्याला रुमाल बांधलेले माडिया युवक यांचे नृत्य ढोलाच्या तालावर रंगत जाते. वाद्ये आदिवासींची वाद्ये त्यांच्या परिसरात उपलब्ध होणाऱ्या वनस्पती व प्राणिजन्य वस्तूंपासून तयार केलेली असतात. ढोल- हे वाद्य आदिवासी नृत्यात सर्वदूर लोकप्रिय आहे. बकऱ्याच्या कमावलेल्या कातड्याने ते मढवितात. ढोलक हे वाद्य आंब्याच्या किंवा वडाच्या पोकळ लाकडाच्या ओंडक्यापासून बनवितात. पागई हे वाद्य ढोलासारखेच असते पण मडक्यापासून माती भाजून बनविलेले असते. नगारा हा नगारा – ढोलाच्या मानाने लहान असतो. लग्नप्रसंगी नगारा वाजवितात. डफ हे चर्मवाद्य आहे. चार ते पाच इंच लाकडी फळीच्या एका गोल कडेवर कमावलेले कातडे मढवितात. डाक या वाद्यांची पुढे गाईच्या खास पटलाची असतात. मौदळ- सागवानाच्या पोकळ गोल ऑडक्यास दोन्ही तोंडाला चामडे बनवून हे वाद्य तयार केले जाते. मंगळी हे वीणेच्या आकारासारखे वाद्य असते. तारपा सुकलेला लांबड दुधी भोपळा, बांबूच्या दोन नळया आणि ताडाची पाने यांच्या साहयाने हे वाद्य बनवतात. काथ्या हे वाद्य तांबे किवा काश्याच्या भांड्यापासून बनवितात. डेरा मातीच्या भांड्यापासून हे वाद्य बनवितात. तुणतुणे पोकळ भांड्याला खालच्या बाजूने कमावलेले कातडे ताणून ताठ बसविलेले असते. ताशा- हे टोपलीच्या आकाराचे चर्मवाद्य आहे. ताशा मंगलप्रसंगी वाजविण्याची प्रथा आहे. किंगरी हे तंतुवाद्य धनकुलीच्या साहयाने वाजवितात. या स्वरवाद्यात ताराऐवजी घोड्याचे केस बसविलेले असते. टिमकी मातीच्या वाडग्यासारख्या भांड्यावर कातडे कसून टिमकी हे वाद्य बनविले जाते. चिटकोरा हे वाद्य म्हणजे चिपळयांची मोठी वाढविलेली आवृती होय. कुंडी हे वाडग्यासारखे दिसणारे वाद्य आहे. त्याच्या पसरट भागाला कमावलेले कातडे ताणून बसविलेले असते. तूर हे पितळी किंवा काश्याच्या थाळीवरचे छोट्या ढोलासारखे वाद्य आहे. पिरी जे हरणाचे शिंग तोंडाने वाजवितात त्यास पिरी म्हणतात. पावरी जमातीत यालाच पिरी म्हणतात. घुंगरु हे वाद्य मुख्यतः तालासाठी असते. बना हे वाद्य परधान जमातीचे अत्यंत प्रिय वाद्य आहे. टिपन्या लाकडाच्या १२ ते १४ लांबीच्या काढ्या कातून गोल करतात. पावा- - डफाबरोबर प्रामुख्याने घ्यावाङ हे वाद्य असते. वरील विविध प्रकारची वाद्ये विविध आदिवासी नृत्यांना जणूकाही कमी पडतात. म्हणून नर्तक स्वतः देखील पदन्यासाच्या तालाशी जुळणारे आवाज काढतात.

जगातील सर्व कलांचे उगमस्थान आदिवासी कला आहेत. हेन्री मूर यांनी म्हटले आहे. आदिवासी कलामध्ये कल्पनांना मूर्त स्वरुप देण्याची शक्ती असते. आदिवासी कलांमध्ये आदिवासींच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसते. त्यांचे अन्न, अन्नाचा उद्गम, त्यांचे सण, भुताखेतांचे समाधान करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे दर्शन, त्यांचे संगीत, नृत्य त्यांच्या कला यात आढळून येते.

भारतात जवळजवळ तीनशे प्रकारचे आदिवासी ज्ञात आहेत. आदिवासीना आपला मुलुख सोडून डोंगरदऱ्या जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. तेथे त्यांनी आपली संस्कृती, आपली जीवनपध्दती शेकडो वर्ष जोपासली. देणघेण पध्दतीने आपापसात एकमेकांच्या गरजा भागवल्या. आसाम भागातील आदिवासी सोडता भारतातील इतर आदिवासी टोळ्यामध्ये जमातीमध्ये कधी लढाया झाल्याचे ज्ञात नाही. समन्वयाने राहण्याचे शिक्षण त्यांना निसर्गानेच दिले असावे.

आदिवासी मुख्यत: वन्यज पदार्थ गोळा करणारे आहेत. मासेमारी, सापळा लावून प्राणी पकडणे, मध, डिंक गोळा करणे. गो-पालन करणे हीच त्यांची जगण्याची साधने आहेत. जादूटोणा, भुताखेतांवर विश्वास यांचा

आदिवासींच्या जिवनपध्दतीवर फार मोठा पगडा आहे. रोगराई, संकटे, मरण ही येऊ नयेत म्हणून भुताखेतांना प्रसन्न ठेवण्याचे ते सतत प्रयत्न करीत असतात. हे त्यांचे प्रयत्न, नृत्य, कलाकुसरीच्या वस्तु भुताखेतांना अर्पण करणे या माध्यमातून केले जातात आणि त्यातून आदिवासी कलांचा विकास होतो.

आदिवासींची कला ते राहत असलेल्या भागातील वनस्पतीवर बरीचशी अवलंबून असते. पशुपालन सुरु करण्यापुर्वीपासून मानवाने जगण्यासाठी वनस्पतींचा आश्रय घेतला धनुष्यबाण, टोपल्या, झोपड्या होड्या बनविण्यासाठी त्यांनी लाकडाचा उपयोग केला.

लाकडाबरोबरच आदिवासींनी मातीपासून धान्य साठविण्यासाठी रांजण, देवदेवतांच्या मूर्ती, नवस फेडण्यासाठी अपर्ण करावयाच्या वस्तु, शोभेच्या वस्तु आणि दफनसाठी रांजण बनविले. आदिवासींनी आपली घरे मातीपासून बनविण्यास सुरुवात केली. बहुतेक आदिवासींची अशी समजूत आहे की माणसाची उत्पत्ती मातीपासून झाली आहे आणि म्हणूनच शिकारीच्या वेळी, जन्म, मृत्यु, आजारपण ह्या प्रसंगी मातीच्या घडविलेल्या प्रतिमा अर्पण केल्या जातात. आदिवासी बनवीत असलेली प्रत्येक वस्तु त्यांच्या जीवनात उपयोगी असते.

आदिवासी कलांची विभागणी काही प्रकारात करता येते. त्यात त्यांची घरे, त्यांचे कपडे, त्यांनी विणलेल्या टोपल्या, चटया, मातीपासून निर्माण केलेली भांडी, शिकारीसाठी मासेमारेसाठी आणि शेती करण्यासाठी निर्माण केलेली हत्यारे, अवजारे, लोखंडाच्या वस्तु व दागिने असतात.

निलगिरीतील आदिवासी दहा प्रकारचे आहेत. जरी ह्या जमाती एकमेकांशी अगदी एकरूप झालेल्या असल्या तरी त्यांच्या कलावस्तुमध्ये खुपच फरक आहे. ह्या निलगिरीतील आदिवासीमधील टोडा ही जमात आपले लक्ष जास्त बंधते. त्यांची घरे वैशिष्टपूर्ण असतात आणि देऊळही उंच पिरामिडासारखे असते. हे सर्व अत्यंत कुशलतेने गवतापासून बनविलेले असते. टोड़ा स्त्रिया कापडावरील भरतकाम सुंदरप्रकारे करतात. चौकोन, त्रिकोण, नागमोडी ओळी आणि ठिपके यांनी परिपूर्ण झालेली शाल फार सुंदर दिसते. तिला प्युटकुलोङ म्हणतात. चांदीचे बनविलेले दागिणे पण टोडा वापरतात. बांबूपासून टोडा लोक अतिशय देखण्या व उपयुक्त वस्तु बनवितात. त्यात ताक बनविण्यासाठी वापरली जाणारी रवी आहे. दफनाच्या वेळी वापरण्यात येणारी म्हशीच्या डोक्याच्या आकाराची छडी आणि इतर प्रकारच्या सुशोभित काव्या हे तयार करतात. टोडांना गाणे आणि नृत्य अतिशय आवडते. पण त्यासाठी लागणारी वाद्य मात्र कोटा जमातीचे आदिवासी तयार करतात, नगारा, झांजा, बासच्या तयार करणारी कोटा ही एकच जमात निलगिरीत आहे. त्याचप्रमाणे ते लोहारी कामही उत्तम दर्जाचे करतात. लोखंडाचे चाकू इत्यादी ते तयार करतात. म्हशीच्या कातड्यापासून ढोल, छत्र्या, विणलेल्या दोऱ्या ते तयार करतात. लोहारकामाप्रमाणे कोटा आदिवासी कुंभारकाम पण चांगल्या प्रकारे करतो.

चांगला पाऊस पडावा आणि पीक चांगले यावे म्हणून करण्यात येणाऱ्या नृत्यात कोटा जमातीचे लोक बनवत असलेली वाद्ये प्रामुख्याने वाजविली जातात. काचेच्या मण्याचे दागिणे आणि पामची पाने विणून केलेले गळयात आणि पायात घालण्याचे दागिने प्रेक्षणीय असतात.

पणियन या जमातीच्या आदिवासीमध्ये कला अभावानेच आढळते. कारण कष्टाचे काम करणारी जमात म्हणून तिच्याकडे पाहिले जाते.

कुरुंभा आणि मूल कुरुंभा हे शिकारी जमातीचे आहेत. ते टोपल्या विणण्यात तरबेज असतात. टोडा सोडून इतर सर्व जमाती मांसाहार घेण्याऱ्या आहेत. टोडा शाकाहारी असून मुख्यत्वेकरून दुग्धाहार घेतात आणि इतर जमातींना दूध आणि दुधापासून होणारे पदार्थ पूरवितात. कोटा हे कलाकार आहेत तर इरुला शिकारी आणि पणियन मजूर आहेत.

निलगिरीत आदिवासींची जमीन चहा, कॉफीच्या प्रचंड मळयांनी व्यापली आहे. सुंदर हवेमुळे आसपासच्या प्रांतातील अनेक लोक निलगिरीत स्थायिक झाले आहेत. आणि त्यांनी हॉटेल व्यवसाय आणि इतर उद्योगधंदे येथे सुरु केले आहेत. ह्या सर्वांच्या सर्वांगीण अतिक्रमणामुळे आदिवासींच्या अस्तित्वालाच प्रचंड धोका निर्माण झाला आहे. प्लास्टिक आणि अल्युमिनिअमच्या रोजच्या

उपयोगातील वस्तूंचा प्रसार निलगिरीत होऊ लागल्याने आदिवासांनी तयार केलेली मातीची भांडी खपेनाशी झाली आहेत. सरकार प्लस्टिकच्या पिशव्यातून जनतेला दूध पुरवू लागले तर टोडांच्या म्हशीचे दूध कोठे खपणार? सरकारी अधिकारी या भागात प्रकल्प अमलात आणतात ह्या महत्वाच्या गोष्टीचा विचारच करीत नाहीत. कारण इथल्या मातीशी त्यांच्या अर्थाअर्थी काहीच संबंध नसतो. त्यांनी लागू केलेल्या तथाकथीत सुधारणामुळे आदिवासी संस्कृती झपाट्याने नाहीशी होत आहे. सुंदर विणकाम, भरतकाम केलेली साडी नेसणारी टोडा स्त्री लवकरच सामान्य दर्जाची नायलॉनची साडी नेसून आपल्यासमोर येईल. पुर्वीच्या शतकानुशतके चालत आलेल्या संस्कृतीचा. चालीरितींचा कलाकुसरीचा आणि समाधानी आयुष्याचा लवकरच नाश झाल्याचे पाहण्याचे दुर्भाग्य आपल्या नशिबी येणार आहे. आदिवासी संस्कृतीबद्दलचे अज्ञान आणि अनास्था ह्या दोन महत्वाच्या बाबी ह्या दुदैवी ऱ्हासाला कारणीभूत आहेत. आदिवासींचा विकास साधण्यासाठी त्यांच्या संस्कृतीचा नाहक बळी जाता कामा नये, आपल्या देशाच्या बहुरंगी, बहुढंगी विविधतेमध्ये आदिवासी संस्कृतीचे स्थान महत्वाचे आहे. हे योजना आखणाऱ्यांनी विसरता कामा नये, शहरी संस्कृती आदिवासी संस्कृतीपेक्षा सरस आहे ही कल्पना पुन्हा नीट तपासून पाहण्याची गरज आता निर्माण झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ-**


१. आदिवासी कथा आणि व्यथा डॉ. धैर्यशील शिरोळे


२. आदिवासी पारधी देवत विधीतील देसक वाद्याचे स्वरुप व वैशिष्ट्ये प्रा. लक्ष्मण शा. पवार यांचा लेख

३. जाती व वर्ग आणि भारतीय समाज लेखक डॉ. भा. कि. खडसे


४. आनंदोत्सव - आदिवासी विशेषांक १ नोव्हेंबर २००८

५. महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य डॉ. सौ. शैलजा देवगांवकर


ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




H GATEWAY





AROGYAM ONLINE




PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER



भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध
ISSN 2321 – 9726
WWW.BHARTIYASHODH.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY
ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)
WWW.IRJMST.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE
ISSN 2319 – 9202
WWW.CASIRJ.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES
ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)
WWW.IRJMSH.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY
ISSN 2454-3195 (online)

WWW.RJSET.COM

INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION
ISSN 2582-5445

WWW.IRJMSI.COM

JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH

WWW.JLPER.COM